# जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक

**वाचा :** १. मा. ना. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र. Insp/I/05/2023, Dtd. 05th January, 2023.

२. मा. ना. उच्च न्यायालय परिपत्रक क्रमांक X-2301/2007 dtd. 09/03/2010.

३. Rule 3, Para 577¼iii½ Appendix 'A' of Civil Manual

# परिपत्रक

जा.क्र. आस्था/१०३/ ८३९२ /२०२४. दिनांक : १२ डिसेंबर, २०२४.

मा. ना. उच्च न्यायालय, मुंबई यांचे संदर्भिय पत्र आणि परिपत्रक तसेच दिवाणी पुस्तिका परिशिष्ट (अ), परिच्छेद 577 (iii) नियम ३ अन्वये नाशिक जिल्हा न्यायीक आस्थापनेवर कनिष्ठ लिपीकांची १०% पदे एस-६ मुळ वेतन रूपये १९९००/-(Pay Leval S-6: (19900-63200)) या वेतन स्तर / वेतनश्रेणीत भरावयाची आहेत.

जिल्हा व सत्र न्यायालय, नाशिक यांचे अधिपत्याखालील सर्व न्यायालयांचे आस्थापनेवर कार्यरत असलेल्या व **तीन वर्षाची सलग सेवा** पुर्ण केलेल्या मुख्य बेलीफ, बेलीफ, वाहन चालक, पुस्तक बांधणीकार, झेरॉक्स ऑपरेटर, हवालदार, नाईक, शिपाई-पहारेकरी व सफाईगार या संवर्गातून कनिष्ठ लिपीक या पदावर पदोन्नतीने नेमणूक करणेकरिता खालीलप्रमाणे अर्हता असणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

## - अर्हता व सुचना -

**१.** कर्मचारी कमीत कमी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदवीधर असावा. तसेच कोणत्याही मान्याताप्राप्त विद्यापीठाचा पदव्युत्तर पदवी आणि कायद्याच्या(विधी) पदवीधरास प्राधान्य दिले जाईल.

**२.** सरकारी व्यावसायिक प्रमाणपत्र परीक्षा किंवा सरकारी मंडळाद्वारे घेतलेली परीक्षा किंवा संगणक टंकलेखन बेसिक कोर्स यामध्ये सरकारी प्रमाणपत्र (GCC-TBC किंवा I.T.I.) -यामध्ये इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. किंवा त्याहून अधिक गती आणि मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. किंवा त्याहून अधिक गती.

**३.** खालीलपैकी कोणत्याही संस्थेतुन प्राप्त M.S.Office, M.S.Word, Wordstar-7 आणि Open Office Org. या व्यतिरिक्त Windows आणि Linux मध्ये Word Processor चालवण्यामध्ये प्राविण्याबद्दल संगणक प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

i) महाराष्ट्र किंवा गोवा राज्यातील वैधानिक विद्यापीठे, यथास्थिती.

ii) महाराष्ट्र किंवा गोवा राज्य तंत्र शिक्षण मंडळ, यथास्थिती.

iii) NIC, DOEACC, APTECH, NIIT, C-DAC, DATAPRO, SSI, BOSTON, CEDIT, M. S. CIT.

iv) महाराष्ट्र किंवा गोवा सरकारने जारी केलेले संगणक ज्ञानाच्या पात्रतेबाबतचे प्रमाणपत्र, यथास्थिती.

Mahabharti.in

४. कर्मचाऱ्याने वरील प्रमाणे उल्लेख केलेल्या प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

५. कर्मचाऱ्याने परिपत्रकासोबतचा विहीत नमुन्यातील अर्ज स्व:हस्ताक्षरात भरुन पाठविणे आवश्यक आहे.

६. कनिष्ठ लिपीक पदासाठी निवड झाल्यास कर्मचा-यास महाराष्ट्र शासनाच्या सेवा नियमानुसार विहीत विभागीय परीक्षा उत्तीर्ण व्हावी लागेल.

७. निवड समिती समान निकष लावून अर्हता/योग्यतेच्या आधारे कनिष्ठ लिपीक पदासाठी उमेदवाराची अल्पसूची तयार करेल. अशा प्रकारे अल्पसूचीत समावेश केलेल्या कनिष्ठ लिपीक पदासाठीच्या उमेदवारांची संगणकावर ३० गुणांची मराठी टंकलेखन परीक्षा व ३० गुणांची इंग्रजी टंकलेखन परीक्षा व ३० गुणांची मौखिक मुलाखत घेण्यात येईल.

८. कर्मचारी कार्यरत असलेल्या पिठासीन अधिकारी यांचे विशेष अहवालाकरिता १० गुण असतील.

०९. कर्मचा-यांना परीक्षा आणि मौखिक मुलाखतीस बोलविल्यास स्व:खर्चाने हजर रहावे लागेल.

१०. प्रतिक्षा / निवड सुची प्रसिध्द झाल्यापासून ती फक्त २ वर्षाच्या कालावधीपर्यंत वैध राहील.

वरील प्रमाणे अर्हता असलेल्या कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज सोबत दिलेल्या विहीत नमुन्यात आपले न्यायिक अधिकाऱ्यांमार्फत **दिनांक : १८ डिसेंबर, २०२४** रोजी किंवा तत्पुर्वी या कार्यालयाकडे पाठवावेत.

उमेदवारांनी अर्जासोबत त्यांची शैक्षणिक पात्रता/इंग्रजी व मराठी टंकलेखन वेग, संगणकीय अभ्यासक्रम या प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्यप्रती पाठवाव्यात.

ज्या उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल अशा उमेदवारांनी त्यांचे मुळ कागदपत्रे पडताळणीसाठी सोबत आणणे आवश्यक राहील. अर्जदाराने कोणतीही खोटी माहिती दिल्यास त्याचा अर्ज नाकारण्यात येईल.

यापूर्वी ज्या कर्मचाऱ्यांनी सदर पदाकरिता अर्ज केलेले असतील त्यांनी पुन्हा अर्ज करणे आवश्यक आहे.

सर्व न्यायिक अधिकाऱ्यांना व विभाग प्रमुखांना सुचित करण्यात येते की, त्यांनी सदर परिपत्रक हे सर्व संबंधीत कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्यावे व आपले आस्थापनेवरील कर्मचाऱ्याने सदर पदाकरिता अर्ज केला असल्यास अशा कर्मचाऱ्यांचा सोबत जोडलेल्या नमुन्यात विशेष पात्रता अहवाल देखील गोपनीय रित्या निम्नस्वाक्षरीकार यांचेकडे सादर करावा.

( श्रीचंद दौ. जगमलानी ) १२-१२-२४

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,

नाशिक.

प्रत - १. नाशिक जिल्हयातील सर्व न्यायालयांना.

२. जिल्हा न्यायालयांतील सर्व विभागांना.

Mahabharti.in

# <u>कनिष्ठ लिपीक पदाकरिता अर्ज..</u>

प्रति,

मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब,
जिल्हा व सत्र न्यायालय,
नाशिक.

**विषय** - कनिष्ठ लिपीक या पदाकरिता अर्ज..

मा. महोदय,

जिल्हा न्यायालय, नाशिक परिपत्रक जावक क्रमांक आस्था/१०३/८३९२/२०२४, दिनांक १२ डिसेंबर, २०२४ अन्वये मी आवश्यक अर्हता धारण केलेली असुन, कनिष्ठ लिपीक या पदाकरिता माझा अर्ज सादर करीत आहे, सदर अर्जाचा विचार व्हावा हि विनंती.

माझी आवश्यक माहिती खालीलप्रमाणेः

१. संपूर्ण नांव : ____________________

२. पदनाम : ____________________

३. कार्यरत ठिकाण : ____________________

४. नेमणुकीची तारीख : ____________________

५. शैक्षणिक पात्रता : ____________________

६. इंग्रजी टंकलेखन वेग : ____________________

७. मराठी टंकलेखन वेग : ____________________

८. संगणकीय ज्ञान : ____________________

अर्जदाराची सही
(संपूर्ण नांव व तारखेसह)

सोबत जोडलेली कागदपत्रे.

१.------------------------------------

२.------------------------------------

३.------------------------------------

४.------------------------------------

५.------------------------------------

६.------------------------------------